# "यावल महाविद्यालयात डॉक्टर अनिल बारी यांचे मार्गदर्शन"

यावल (वार्ताहर) येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात नुकतेच रजिस्ट्रेशन प्रक्रिया व युजीसीच्या नवीन गाईडलाईन या विषयावर भौतिकशास्त्र विषयाचे प्राध्यापक डॉ. अनिल बारी बोदवड यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे होत्या.

डॉ. अनिल बारी यांनी रजिस्ट्रेशन प्रक्रियेविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच संदर्भातील नवीन काही गाईडलाईनची माहिती दिली. यावेळी समन्वयक डॉ. हेमंत भंगाळे व (IQAC) प्रमुख प्रा. एस आर गायकवाड यांनी प्रश्न विचारून शंका निरसन केले.

आई. क्यू. ए. सी. विभागातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा. ए. पी. पाटील, प्रा. एम. डी. खैरनार व सर्व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुधा खराटे यांनी केले. तर आभार प्रा. आर. डी. पवार यांनी मानले.